राष्ट्रीय आरोग्य अभियान,बुलडाणा
कंत्राटी पदभरती जाहिरात
उमेदवारांकरीता सुचना

जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटंब कल्याण सोसायटी जिल्हा परीषद बुलडाणा अंतर्गत विविध कार्यक्रमा मधील १) **Programme Manager Public Health, 2) Lab Technician, 3)** वरिष्ठ क्षयरोग उपचार पर्यवेक्षक **STS (RNTCP), 4) सामाजिक कार्यकर्ता NMHP,5) Yoga & Naturopathy Therapist, 6) Cold chain technicians,7) Counsellor,8) District Programmme Manager (AYUSH),9) Data Entry Operator,10) Dental Hygienist,11) Psychologist** ही रिक्त कंत्राटी पदे भरावयाची आहेत, त्यानुसार सदर पदांकरीता इच्छुक उमेदवारांनी अटी व शर्ती बाबत जिल्हा परीषद बुलडाणाच्या अधिकृत संकेत स्थळावर (https://zpbuldhana.maharashtra.gov.in/) जाहिरात बघुन दिनांक 17/01/२०२४ ते 29/01/२०२४ रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते ०६.०० या कालावधीत विहीत नमुन्यामध्ये आवश्यक डिमांड ड्राप्ट सह अर्ज जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद बुलडाणा येथे (सुटीचे दिवस वगळुन) सादर करावे. दिनांक 29/01/२०२४ रोजी सायंकाळी ०६.०० नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

अध्यक्ष निवड समिती
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, बुलडाणा.

जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी बुलडाणा अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमा अंतर्गत मंजुर कृती आराखडया नुसार खालील दर्शविलेल्या कंत्राटी रिक्त पदे भरावयाची आहेत. सदर रिक्त पदां करिता पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क | पदनाम | शैक्षणिक अर्हता | या जाहीरातीनुसार भरावयाची प्रवर्ग निहाय रिक्त पदे | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | Programme Manager Public Health | Any Medical Graduate with MPH / MHA - with 3 years experience | अजा-०१,अज-०१,ई.डब्ल्यु.एस.-०१ खुला-०३ एकुण ०६ | ३५,०००/- |
| 2 | Lab Technician | 12 science + DMLT | अज-०१, भज-ब-०१, भज-क-०१, भज-ड-०१, ई.डब्ल्यु.एस.-०२, खुला-०४ एकुण-१० | १७,०००/- |
| 3 | वरिष्ठ क्षयरोग उपचार पर्यवेक्षक STS (RNTCP) | 1)Any graduate with 2 years exp<br>2) Permanent Two wheeler, driving License & Should be able to drive two wheeler<br>3)MSCIT | अज-०१, विजा-अ-०१ एकुण २ | २०,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | सामाजिक कार्यकर्ता<br>**Social Worker** NMHP | As per Mental Health Care Act 2017A Post Graduate degree in social work and a Master of Philosophy in Psychiatric Social Work obtained after completion of a full time course of two years which includes supervised clinical training from any university Grants commission act 1956 or such recognized qualification as may be prescribed and 2 Year Relevant experience | ई.डब्ल्यु.एस -०१<br>एकुण ०१ | २८,०००/- |
| 5 | Yoga & Naturopathy Therapist | 12th + Diploma / Degree/ Post graduation degree in yoga. | खुला -०१ एकुण ०१ | १७,०००/- |
| 6 | Cold chain technicians | 12th + महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे यांत्रिकी/विद्युत अभियांत्रिकी शाखेतील पदवी/ पदवीका उत्तीर्ण किंवा शासकिय औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमधील प्रशितन व वातानुकुलीकरण २ वर्षाचा ट्रेड उत्तीर्ण | खुला -०१ एकुण ०१ | १७,०००/- |
| 7 | Counsellor | MSW | खुला -०१ एकुण ०१ | २०,०००/- |
| 8 | District Programmme Manager (AYUSH) | Any Medical Graduate with MPH / MHA - with 3 years experience | खुला -०१ एकुण ०१ | ३५,०००/- |
| 9 | Data Entry Operator | Any Graduate with Typing Skill Marathi 30,English 40 , MSCIT | खुला -०१ एकुण ०१ | १८,०००/- |
| 10 | Dental Hygienist | 12 science + Diploma/Certificate Course (2 Years) in Dental Hygiene From an Institute recognized by Dental Council of India | खुला -०१ एकुण ०१ | १७,०००/- |
| 11 | Psychologist | (I) Having a recognized qualification in Clinical Psychology From an institution approved and recognized by the Rehabilitation Council of India, Constituted under Section 3 of the Rehabilitation council of India Act 1952<br>Or<br>(II) Having a Post-Graduate Degree in Psychology or clinical Psychology or Applied psychology and a Master of philosophy in clinical psychology Or Medical and social supervised clinical training from any university recognized by the University Grants Commission established under the university Grants Commission Act 956 and Approved and recognized by the Rehabilitation Council of India Act 1952 or such recognized Qualifications as may be prescribed | खुला -०१ एकुण ०१ | ३०,०००/- |

अटी व शर्ती :-

- जाहिरातीतील पदे राज्य शासनाची नियमीत पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायम पणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागू

नाही. तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासना मार्फत सेवा संरक्षण किंवा त्या संबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

- अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारिरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.
- उपरोक्त कंत्राटी पदाकरिता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.
- वयोमर्यादा :- १) उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतीम दिनांकास अर्ज केलेल्या पदाकरिता विहीत वयोमर्यादा आणि आवश्यक किमान शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक राहील. २) अर्ज सादर करण्याचे अंतीम दिनांकास खुल्या व सामाजिक आरक्षण प्रवर्गातील उमेदवाराचे वय १८ पेक्षा कमी नसावे. ३) अर्ज सादर करण्याचा अंतीम दिनांकास खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचे वय ३८ वर्षा पेक्षा जास्त नसावे. व राखीव प्रवर्गातील उमेदवाराचे वय ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. ४)राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचा-यांसाठी वयाची अट शिथील करण्यात आलेली आहे.५)उमेदवारास २ किंवा त्यापेक्षा कमी अपत्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.२ पेक्षा जास्त अपत्य असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. तसे जाहिरातीमध्ये जोडण्यात आलेले प्रतिज्ञापत्र नमुना अ आपल्या स्वाक्षरीने अर्जासोबत जोडण्यात यावे.
- कामाचा अनुभव हा शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थांचा ग्राहय धरण्यात येईल. तसेच ज्या उमेदवारांनी Covid -19 मध्ये काम केले आहे अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल, याकरीता त्यांच्याकडे Covid 19 मध्ये काम केल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.
- सर्व प्राप्त अर्जांची शैक्षणिक अर्हता आणि आवश्यक अनुभव या आधारे छाननी करण्यात येईल छाननी अंती सर्व निकष पुर्ण करणाऱ्या उमेदवारास खालील तक्यात नमुद केल्यानुसार गुणांक देण्यात येतील.

| विविरण | तपशिल | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying Exam मधील गुण ( अंतीम वर्षाच्या गुणाच्या आधारे | मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportion काढावे. (उदा.६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०: प्रमाणे Proportion = 60*50/100=30) | अधिकतम गुण ५० |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षधिक अर्हता असल्यास (संबंधीत विषयाची शैक्षणिक अर्हता विचारात घेण्यात येईल.) | अधिकतम २० गुण देण्यात येतील मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे Proportion काढावे (उदा.**स्टाफ नर्स (Staff Nurse)** पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पुर्ण करुन अतिरीक्त B.sc(Nursig) हि शैक्षणिक अर्हता पुर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.sc(Nursig) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०%प्रमाणे Proporation = 60*20/100=12 गुण | २० गुण |
| संबंधीत पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक एका वर्षासाठी ६ गुण देण्यात येतील फक्त शासकिय संस्था, विभाग शासन अंगीकृत संस्था,NHM यांचाच अनुभव ग्राहय धरण्यात येईल (प्रतेक १ वर्षाकरीता ६ गुण जास्तीत जास्त ३० गुण) | ३० |
| एकुण गुण | | १०० |

- मा.सहसंचालक (अतांत्रीक) रा.आ.अ. मुंबई यांचेपत्रक्र. राआसो/ मनुष्यबळ/ आरक्षण/ २४५४६-७७४/१६ दि. २०.०७.२०१६ रोजीच्या पत्रानुसार आवश्यक असणा-या आरक्षीत संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करणा-या इतर संवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.
- सदरहु जाहिरातीस अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहित मुदतीत प्राप्त होतील. केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील.अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
- जाहिराती मधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणांमध्ये बदल होऊ शकतो. याबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. बुलडाणा यांनी राखून ठेवले आहेत.
- अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.
- **एका पेक्षा अधिक पदांकरिता** अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदा करिता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.
- निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या नोटीसबोर्डवर किंवा बुलडाणा जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. या बाबत कुठलाही स्वतंत्र पत्र व्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.
- निवड यादीतील गुणानुक्रमानुसार प्राधान्यक्रमाने पदस्थापना केली जाईल. त्या बाबत उमेदवाराने कुठल्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.
- शासकीय, निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणा-या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.
- अर्जदाराला कंत्राटी कालावधीत सोयीनुसार ठिकाण बदलुन मिळण्याचे मागणी करता येणार नाही.

भरती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे/पदभरती प्रक्रियेत बदलकरण्याचे सर्व अधिकार मा. अध्यक्ष निवड समिती तथा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, बुलडाणायांनी राखुन ठेवले आहेत. या बाबत उमेदवारास कोणताही दावा करता येणार नाही.

- उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्राच्या छायांकित प्रतीसह आपले अर्ज जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, बुलडाणा येथे दि 17/01/२०२४ पासुन 29/01/२०२४ पर्यत सायंकाळी ६ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत स्वतःअथवा पोस्ट मार्फत सादर करावेत. इतर कोणत्याही पध्दतीने(ऑनलाईन,ईमेल) आलेले अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. अर्ज सादर केल्यानंतर अर्ज स्विकृती पोच पावती कार्यालयाकडून घेणे आवश्यक राहील.ठरवुन दिलेल्या दिनांकानंतर प्राप्त अर्ज कुठल्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाही.
- खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु.१५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी १००/- रु चा डिमांड ड्राप्ट अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे. व डिमांड ड्राप्टच्या मागे स्वतःचे नांव स्वहस्ताक्षरात लिहावे. सदरचा डिमांड ड्राप्ट जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, बुलडाणा या नावाने काढावा.
- सदरहू भरती प्रक्रिये करिता अर्ज करण्याची शेवटची तारीख 29/01/२०२४ राहणार असून तद्नंतर अर्जाची छाननी, हरकती आक्षेप प्राप्त करुन घेणे, निकाली काढणे, लेखी

परिक्षा/मुलाखत प्रक्रिया, निवड यादी प्रसिध्द करणे, आदि रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियाना कडिल प्राप्त मार्गदर्शक सुचना नुसार भरती प्रक्रिया पार पाडून निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे इ. बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी बुलडाणा जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर किंवा नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याबाबत पुनश्चः वर्तमान पत्रामध्ये जाहिरात दिली जाणार नाही.

- निवड झालेल्या उमेदवारास रु. १००/-च्या बॉन्ड पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल
- उमेदवारांनी अर्ज सादर केल्या नंतर विहित नमुन्यातील पोच पावती कार्यालयाकडून देण्यात येईल. सदर पोचपावती उमेदवारांनी जपून ठेवावी व सदर पोचपावती कार्यालयाने मागणी केल्यास देणे बंधनकारक राहील.
- खालील प्रमाणे आवश्यक असलेल्या मुळकागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या छायांकित प्रती अर्जाच्या सोबत जोडाव्यात. १)शैक्षणिक अर्हते बाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रीका २)जातीचे प्रमाणपत्र ३) शाळा सोडल्याचा/जन्मतारखेचा दाखला ४) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्र ५) पासपोर्ट आकाराचा फोटो ६) ज्या पदांसाठी कौन्सिलच्या नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता आहे त्या उमेदवारांनी वैध प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. प्रमाणपत्र नोंदणीसाठीची पावती ग्राहय धरली जाणार नाही.
- राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना सदर पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास त्या कर्मच्याऱ्यांनी आपल्या कार्यालय प्रमुखाची पुर्वपरवानगी घेणे अवश्यक राहील व तसे परवानगी पत्र सदर अर्जा सोबत जोडणे बंधनकारक राहील, तसे परवानगी पत्र नसल्यास व राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असल्याचे निदर्शनास आल्यास सदर अर्जदाराचा अर्ज अपात्र करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

स्वा/-

अध्यक्ष निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद बुलढाणा

# राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद बुलडाणा
# अर्जाचा नमुना

—————————————————— या पदासाठी अर्ज

प्रती,

मा. सदस्य सचिव,

जि.ए.आ.व कु.क.सो,

तथा जिल्हा अरोग्य अधिकारी

जिल्हा परिषद, बुलडाणा

१) संपूर्ण नांव :——————————————

२) वडिलांचे/पतीचे नांव :——————————————

३) आईचे नांव :——————————————

४) पत्रव्यवहाराचा पत्ता :——————————————

(पिनकोड सहित) ——————————————

५) दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक : —————— ईमेल आयडी ——————

६) जन्मतारीख : / / आज रोजीचे वय ———वर्षे ———महिने ———दिवस

**७) कोणत्या प्रवर्गासाठी अर्ज केलेला आहे त्याप्रमाणे चौकटीमध्ये (✓) अशी खुन करावी.**

| अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | आर्थिक मागास प्रवर्ग | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SC | ST | VJA | NTB | NTC | NTD | SBC | OBC | EWS | Open |
| | | | | | | | | | |

८) शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठ/मंडळाचे नांव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | एकुण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

९) अनुभव

| संस्थेचे नांव व पत्ता | कालावधी | | एकूण कालावधी |
|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | |
| | | | |
| | | | |
| | | | |

१०)डीमांड ड्राफ्ट क्रमाक :- ..................................................................................

११)आपणाविरुध्द न्यायप्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे काय असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा

१२)अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडल्या आहेत.

१)

२)

३)

४)

५)

६)

७)

१३) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय होय/नाही.............

मी असे प्रमाणीत करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असून, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रदद करण्यात येईल व माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

दिनांक :

ठिकाण :

स्वाक्षरी ——————————

नांव——————————

प्रतिज्ञापत्र

नमुना अ

मी श्री/श्रीमती/कुमारी............................................................

श्री.......................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय.......... वर्ष, राहणार.........................................................

याव्दारे असे जाहीर करतो/करते की,

१) मी............................................ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ........................(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै २०२० या नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या .......... आहे. (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा)

३) दिनांक २३ जुलै २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै २०२० व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र ठरेल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

स्वाक्षरी

दिनांक :-